**वास्तुशिल्प - श्री. बाळकृष्ण दोशी (अहमदाबाद)**

जागतिक ख्यातीचे सुप्रसिध्द वास्तुरचनाकार पद्मश्री डॉ. बाळकृष्ण दोशी यांनी मुंबईतील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्किटेक्चर येथे शिक्षण घेऊन पॅरिस येथील जगप्रसिध्द मास्टर ऑर्किटेक्ट ली कॉर्बुसिएर यांच्याकडे १९५१ ते १९५४ पर्यंत काम केले. तसेच पुढील चार वर्षे त्यांच्या अहमदाबाद येथील वास्तुप्रकल्पाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.

१९५५ साली अहमदाबाद येथे स्वतःचे ऑफिस वास्तुशिल्प पर्यावर्णात्मक रचना या नावाने सुरु केले. कुशल वास्तुरचनाकार म्हणून सुप्रसिध्द असलेले दोशी हे वास्तुनिर्मिती शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच विविध शैक्षणिक संस्थांचे निर्माता म्हणून नावाजलेले आहेत. अहमदाबाद येथील स्कूल ऑफ आर्किटेक्चर १९६२-७२ आणि स्कूल ऑफ प्लॅनिंग १९७२-७९ या संस्थांचे ते प्रवर्तक असून संस्थापक संचालक म्हणून त्यांनी विशेष योगदान दिले आहे. या दोन्ही संस्था भारतातील आधुनिक वास्तुशास्त्र व नगररचना प्रशिक्षण क्षेत्रातील मानदंड मानल्या जातात. त्यांना जागतिक दर्जा मिळवून देण्यात दोशींचा सिंहाचा वाटा आहे.

त्यांनी पर्यावर्णात्मक वास्तुरचनेचा सखोल अभ्यास आणि शोधकार्य कारणाऱ्या वास्तुशिल्प फाऊंडेशन या संस्थेची स्थापना करुन या क्षेत्राला नवी दिशा देण्याचे मोलाचे कार्य केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात उत्कृष्ट दर्जा आणि मूल्ये असलेल्या वास्तुनिर्मिती करणाऱ्या दिग्गजांमध्ये डॉ. दोशी हे अग्रणी आहेत. त्यांनी केलेल्या वास्तुरचनांमध्ये अहमदाबाद येथील स्कूल ऑफ आर्किटेक्चर परिसर (CEPT) हुसेन दोशी गुफा तसेच बंगळूर येथील आय आय एम (IIM) आणि दिल्लीतील एन आय एफ टी (NIFT) यांचा विशेष उल्लेख केला जातो. वास्तुविशारद दोशी हे बहुआयामी व्यक्तिमत्व असून व्यवसायिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल विविध पुरस्कारांनी देशात आणि विदेशात त्यांना सन्मानित केले आहे. भारत सरकारनी पद्मश्री पुरस्काराने त्यांचा गौरव केला आहे.

१९५८ पासून वास्तुरचना शिक्षण तज्ज्ञ या नात्याने युरोप व अमोरिका येथील अनेक विश्वविद्यालयात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. विविध नियतकालिके आणि पुस्तकांद्वारे त्यांनी विपुल लेखनही केले आहे.

डॉ. दोशी यांना आर आय बी ए (RIBA) लंडन आय आय ए (IIA) भारत या दोन विश्वविख्यात वास्तुविशारद संस्थांची अत्यंत प्रतिष्ठेची फेलोशिप आहे. वास्तुरचनांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये, आगाखान पुरस्कार तसेच सर्वोच्य समजल्या जाणाऱ्या प्रिटझ्कर पुरस्काराच्या परिक्षण मंडळावर कार्य करण्याचा बहुमान त्यांना प्राप्त झाला आहे. वास्तुरचना क्षेत्रात जगभरात त्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते.